सार्वजनिक आरोग्य विभाग

**महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा**

| | |
|---|---|
| *डॉ.अश्विनी स. भामरे,*<br>*वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१, स्त्री रुग्णालय, धुळे*<br>*ता.धुळे जि.धुळे,* | कार्यालय :- ०२५६२ २८२८७५<br>वै.अधिक्षक :- ०२५६२ २३७६२०<br>फॅक्स :- ०२५६२ २८२८७५<br>ई मेल :- **womenshospitaldhule@gmail.com** |
| ***"आरोग्य सेवा"*** | जा.क्रं./मरुधु/अवैभा/पेस्ट कंट्रोल/दरपत्रके/380-97/२६<br>दिनांक :- 8/5/26 |


प्रति,

.....................................

.....................................

.....................................

**विषय** :- महिला व बाल रुग्णालय, धुळे येथील संपुर्ण इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणे कामी दरपत्रके मागविणे बाबत...

उपरोक्त विषयान्वये आपणास सविनय सादर करण्यात येते कि, १०० खाटांचे **महिला व बाल रुग्णालय, धुळे च्या इमारतीचे** मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य, **मुंबई व** मा. पालकमंत्री **धुळे** यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन करुन पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत करण्याचे **नियोजित** आहे. महिला व बाल रुग्णालयातील संपुर्ण इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी आपणा कडुन खालील अटी व शर्तीनुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रके दि. 8/5/26....... ते 15/5/26......... पर्यंत या कार्यालयास कार्यालयीन वेळेत पोहोच करावीत. सदर दरपत्रके दिनांक 16/5/26....रोजी सकाळी ११ वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. त्यावेळेस आपण उपस्थित राहावे.

**दरपत्रके पाठविण्याच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.**

१) सदरचे दर हे वैद्यकिय अधिक्षक महिला व बाल रुग्णालय, धुळे यांचे रुग्णालयातील विभागांपर्यंत पोहचविण्यात येईपर्यतचे असावे.
२) दरपत्रके ही सिलबंद पाकिटातून पाठविण्यात यावे.
३) पेस्ट कंट्रोल साठी वापरण्यात येणाऱ्या बाबी **Good Quality** देणे बंधनकारक राहिल.
४) वर नमुद केलेल्या यादीत कोणताही बदल करण्यात येऊ नये किंवा अनुक्रंमाक बदलण्यात येऊ नये असे आढळल्यास दरपत्रके रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५) दुकानाचे शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी पत्रकाची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.
६) व्यवसायाच्या व्याप्तीनुसार GST क्रंमाक व नोदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.
७) दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा किंवा इतर जिल्हयात किंवा इतर ठिकाणी सादर केलेल्या दरापेक्षा जास्त नसावे.

८) आयकर, व्यवसाय कर तसेच नियमानुसार जे शासकिय कर लागू असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहिल. तसेच देयकातून नियमानुसार TDS कपात करण्यात येईल.

९) आपल्या संस्थेचे या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांचेसोबत हितसंबंध नाही याबाबतचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करावे.

१०) आपल्या संस्थेने /कंपनीने एकच निविदा भरल्याचे एकल निविदाबाबतचे हमीपत्र सोबत सादर करणे बंधनकारक राहील.

११) कोणतेही कारण न देता दरपत्रके मंजूर करावयाची अथवा नाकारण्याचा अधिकार किंवा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित ठेवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक महिला व बाल रुग्णालय, धुळे यांनी राखून ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही.

(डॉ.अश्विनी स. भामरे)
वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१
जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय, धुळे

प्रतः- माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर

१२) मा. सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई

१३) मा. उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक

१४) मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, धुळे